# डिसेंबर २०१७ व जानेवारी ते मार्च २०१८ दरम्यान पिकांच्या संभाव्य किंमतींचा अहवाल





## नोव्हेंबर २०१७








**भारतीय कृषि विपणन माहिती व विश्लेषण केंद्र**

महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प

प्लॉट एफ/इ/७८, पहिला मजला, भूविकास बँक इमारत,

मार्केटयार्ड, गुलटेकडी, पुणे - ४११ ०३७.

फोन : ०२० २४२७०३१५,

वेबसाईट : http://macp.gov.in

टिप : सदर अहवाल हा बाजाराची सद्यस्थिती व भविष्यकालीन किंमत विषयक अनुमान दर्शवितो. स्थानिक व आंतरराष्ट्रीय पातळीवर नैसर्गिक (उदा. वातावरणातील बदल किवा पिकांवरील रोगराई) तसेच आर्थिक घटकांमुळे संभाव्य किंमतीमध्ये बदल होऊ शकतो. वाचकांनी सदर अहवालाचा काळजीपूर्वक वापर करावा, अन्यथा होणा-या नुकसानीस MACP प्रकल्प

## कांद्याचा संभाव्य किंमती - डिसेंबर २०१७ व जानेवारी २०१८

कांदा हे अतिशय महत्वाचे व्यावसायिक भाजीपाला पिक आहे. कांदा अतिशय नाशवंत असल्यामुळे किंमतीं मध्ये खुप अस्थिरता जाणवते. तसेच माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर २०१७ दरम्यान लासलगाव बाजारातील कांद्याच्या सरासरी किंमती रु. २१६५ प्रति क्विंटल होत्या.

FAO (२०१४) च्या आकडेवारीनुसार जागतिक कांदा उत्पादनात चीन नंतर भारताचा दुसरा क्रमांक लागतो. तसेच एकुण जागतिक कांदा उत्पादनात २०% वाटा भारताचा आहे. भारतात महाराष्ट्र (२८%), हे प्रमुख कांदा उत्पादक राज्य असुन त्या नंतर कर्नाटक (१७%) व मध्य प्रदेश (१५%) या राज्याचा क्रमांक लागतो.

राष्ट्रीय अप्लाइड इकॉनॉमिक रिसर्च परिषद(एन.सी.ए.इ.आर,रब्बी आउटलुक रिर्पाट मार्च २०१७) नुसार वर्ष २०१६-१७ मध्ये २२.५ दशलक्ष टन कांदा उत्पादनाचा अंदाज आहे, व जे मागील २०१५ -१६ तील उत्पादनाच्या (२०.९९ दशलक्ष टन) च्या तुलनेत ७.२%जास्त आहे. भारतातून कांद्याची निर्यात मुख्यतः बांग्लादेश, मलेशिया, संयुक्त अरब अमिरात व श्रीलंका या देशामध्ये केली जाते.

सी.एम.आय.ई च्या सन २०१६ - १७ च्या अंदाजानुसार भारतातील कांद्याचे क्षेत्र ११.८३ लाख हेक्टर आहे. तसेच ते मागील वर्षी १३.२० लाख हेक्टर होते. तसेच नाशिक, पुणे, सातारा, जळगांव, धुळे, अहमदनगर, नागपूर व सोलापूर ही महाराष्ट्रातील प्रमुख कांदा उत्पादक जिल्हे आहेत.

मागील १२ वर्षांतील कांद्याच्या किंमतींच्या विश्लेषण व बाजारातील सध्यस्थिती वरुन, **डिसेंबर २०१७ ते जानेवारी २०१८** महिन्यातील लासलगांव बाजारातील कांद्याच्या संभाव्य सरासरी किंमती **रु. २००० ते रु. ३५०० प्रति क्विंटल** या दरम्यान राहतील असे अपेक्षित आहे. सुधारीत अहवाल प्रत्येक महिन्याला प्रकाशित केला जाईल. पुढील अंदाज अहवाल माहे डिसेंबर २०१७ अखेर केला जाईल.

* * * * *

## टोमॅटोच्या संभाव्य किंमती - डिसेंबर २०१७ व जानेवारी २०१८

टोमॅटो हे अतिशय महत्वाचे व्यावसायिक व आहारातील भाजीपाला पिक आहे. व्यावसायिक दृष्ट्या टोमॅटो हे कमी कालावधीचे, जास्त उत्पन्न मिळवून देणारे व किफायतशीर आहे, त्याचबरोबर ते अत्यंत नाशवंत पिक आहे. ऑक्टोबर-नोव्हेंबर २०१७ दरम्यान पुणे बाजारात टोमॅटोच्या सरासरी किंमती रुपये २३२० प्रति क्विंटल होत्या.

FAO (२०१४) च्या आकडेवारी नुसार, जागतिक टोमॅटो उत्पादनात चीन नंतर भारताचा दुसरा क्रमांक लागतो. तसेच एकुण जागतिक टोमॅटो उत्पादनात भारताचा ८% वाटा आहे. राष्ट्रीय फलोत्पादन मंडळाच्या सन २०१४-१५ च्या आकडेवारीनुसार, (भारतात महाराष्ट्र राज्य हे टोमॅटो उत्पादनात दहाव्या क्रमांकावर आहे. त्यानंतर मध्यप्रदेश, (१३%), कर्नाटक (१२%), आंध्र प्रदेश (९%), ओडिसा (८.४%) व गुजरात (७.७%) या राज्याचा क्रमांक लागतो.) नाशिक, पुणे, सातारा, अहमदनगर, नागपूर व सांगली ही महाराष्ट्रातील प्रमुख टोमॅटो उत्पादक जिल्हे आहेत.

राष्ट्रीय फलोत्पादन मंडळाच्या सन २०१६-१७ च्या तृतीय अंदाजानुसार भारतातील टोमॅटोचे क्षेत्र व उत्पादन अनुक्रमे सुमारे ८ लाख हेक्टर व २० दशलक्ष टन आहे. तर सन २०१५ -१६ करिता ते अनुक्रमे सुमारे ७.७ लाख हेक्टर व १८.७ दशलक्ष टन होते.

मागील १२ वर्षांतील किंमतीच्या विश्लेषण, बाजार सर्वेक्षण व बाजारातील सध्यस्थिती वरुन, **डिसेंबर २०१७ ते जानेवारी २०१८** महिन्यात पुणे बाजारातील टोमॅटोच्या संभाव्य सरासरी किंमती **रु. १५०० ते रु. ३००० प्रति क्विंटल** या दरम्यान राहतील, असे अपेक्षित आहे. सुधारीत अहवाल प्रत्येक महिन्याला प्रकाशित केला जाईल. पुढील अंदाज अहवाल माहे डिसेंबर २०१७ अखेर केला जाईल.

* * * * *

## सोयाबीनच्या संभाव्य किंमती - जानेवारी ते मार्च २०१८

सोयाबीन हे आंतराष्ट्रीय स्तरावरील महत्वाचे तेलबिया पीक आहे. भारतात मुख्यतः खरिप हंगामात सोयाबीनची लागवड केली जाते. सोयाबीनच्या किंमतीवर फक्त भारतातील नव्हे तर जगातील उत्पादन व उपभोग करणाऱ्या देशातील मागणी व पुरवठा याचा परिणाम होतो. अमेरिका, ब्राझील, अॅर्जेटिना, चीन व भारत या देशात सोयाबीनचे मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतले जाते. जागतिक सोयबीन उत्पादनात या देशांचा जवळजवळ ९०% इतका वाटा आहे.

अमेरिकन शेती विभागाच्या जागतिक शेतमाल पुरवठा व मागणी अंदाज अहवालानुसार (नोव्हेंबर २०१७) सन २०१७-१८ मध्ये जगात ३४८.८९ दशलक्ष टन सोयाबीनचे उत्पादन होईल असा अंदाज वर्तविला आहे. मागील वर्षी जगात सोयाबीनचे ३५१.२५ दशलक्ष टन उत्पादन झाले होते. मागील वर्षीच्या तुलनेत चालु वर्षीचा सोयाबीनचा अंतिम साठा अधिक असल्यामुळे त्यांचा जागतिक सोयाबीनच्या किंमतीवर दबाव राहण्याची शक्यता आहे. कृषि मंत्रालय, भारत सरकारच्या पीक परिस्थिती अहवालानुसार (दि.२२ सप्टेंबर २०१७) चालू खरीप हंगामात १०५.७० लाख हेक्टर्सवर सोयाबीनची लागवड करण्यात आली आहे. मागील वर्षी ११४.७२ लाख हेक्टर्सवर लागवड करण्यात आली होती. मागील वर्षीच्या तुलनेत चालू वर्षी सोयाबीन पिकाखालील लागवड क्षेत्रात ७.८६% नी घट झाली आहे. USDA च्या WASDE अहवालानुसार (नोव्हेंबर २०१७) सन २०१७-१८ मध्ये भारतात सोयाबीनचे उत्पादन १०.०० दशलक्ष टन होण्याची शक्यता वर्तविली आहे. हे उत्पादन मागील वर्षीच्या USDA च्या उत्पादन आकडेवाडीनुसार तुलनेने १३% ने कमी आहे. कृषि विभाग, महाराष्ट्र शासनाच्या माहितीनुसार राज्यात ३८.३९ लाख हेक्टर्सवरती सोयाबीनची लागवड झाली आहे. भारतीय सोयाबीन प्रोसेसर्स असोसिएशन खरिप २०१७ च्या अहवालानुसार महाराष्ट्रात ३१.८९ लाख टन उत्पादन होण्याची शक्यता वर्तवली आहे. हे उत्पादन मागील वर्षीच्या तुलनेत १९ टक्केनी कमी आहे.

केंद्रिय कृषि मंत्रालयाच्या प्राथमिक उत्पादन अंदाज अहवालानुसार चालू खरिप हंगाम देशात सोयाबीनचे उत्पादन १२२.१७ लाख टन होईल असा अंदाज वर्तविला आहे. मागील वर्षी देशात १३७.९३ लाख टन उत्पादन झाले होते. मागील वर्षीच्या तुलनेत सोयाबीन उत्पादनात १५.७७ लाख टन घट झाली आहे. माहे ऑगस्ट ते ऑक्टोबर २०१७ दरम्यान इंदूर बाजारात सोयाबीनच्या सरासरी किंमती रु.२९९६ प्रती क्विंटल होत्या सन २०१७ -१८ च्या खरिप हंगामासाठीची किमान आधारभूत किंमत रु. ३,०५०/- प्रति क्किटल जाहिर केली आहे. मागील दोन वर्षामधील इंदूर बाजारातील सोयाबीनच्या जानेवारी ते मार्च महिन्यातील सरासरी किंमती पुढील प्रमाणे.

| वर्ष | जानेवारी ते मार्च किंमती रु. (प्रति क्विंटल) |
|---|---|
| २०१५-१६ | ३७९३/- |
| २०१६-१७ | ३०३९/- |

## भारतीय कृषी विपणन व माहिती विश्लेषण केंद्र

दि. २४ नोव्हेंबर २०१७ रोजीच्या इंदूर बाजारातील सोयाबीनच्या फ्युचर्स किंमती खालील प्रमाणे.

| महिना | किंमती रु. (प्रति क्विंटल) |
|---|---|
| डिसेंबर २०१७ | रु. २९९९/- |
| जानेवारी २०१८ | रु. ३०५८/- |
| फेब्रुवारी २०१८ | रु. ३१०८/- |
| मार्च २०१८ | रु. ३१७५/- |
| एप्रिल २०१८ | रु. ३२३०/- |

मागील काही वर्षातील किंमतीचे अर्थमिती विश्लेषण, व बाजारातील सद्यस्थिती माहे **जानेवारी ते मार्च २०१८** या कालावधीत बाजारात सोयाबीनच्या संभाव्य किंमती **रु.२,८०० ते ३,२००/- प्रति क्विंटल** या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. सदर अहवाल प्रत्येक महिन्याला प्रकाशित केला जाईल. पुढील अंदाज अहवाल डिसेंबर २०१७ मध्ये प्रकाशित केला जाईल.

*****

## मक्याच्या संभाव्य किंमती - ऑक्टोबर ते डिसेंबर २०१७ व जानेवारी ते मार्च २०१८

सन २०१६ - १७ मध्ये जागतिक मका उत्पादनात भारताचा वाटा २.६% होता. देशात मका पिकाचे ७३% उत्पादन खरीप हंगामात होते व उर्वरीत रब्बी हंगामात होते. मक्याच्या किंमती वर गुणवत्ता, आर्द्रता, पुरवठा व मागणी याचा परिणाम होतो. मागील १ महिन्यामध्ये निझामाबाद या बाजारातील मक्याची सरासरी किंमत रु. १,४०० /- प्रति क्विंटल इतकी आहे. त्याचबरोबर मक्याच्या वायदे बाजारातील सध्याच्या किंमती वाढता कल दर्शवित राहीली आहेत.

भारत सरकारच्या कृषि मंत्रालयाने प्रकाशित केलेल्या अहवालानुसार वर्ष २०१६-१७ मध्ये उत्पादन २६.२६ मिलीयन टन इतके झालेले आहे. मक्याच्या उत्पादनात मागील वर्षीच्या तुलनेत १९% वाढ झालेली दिसते. वर्ष २०१६-१७ मध्ये ८.३० दशलक्ष हेक्टर इतक्या क्षेत्रावर लागवड होती. तर वर्ष २०१७-१८ मध्ये ७.९६ दशलक्ष हेक्टर इतक्या क्षेत्रावर लागवड झालेली आहे.

भारत सरकारच्या कृषि मंत्रालयाने प्रकाशित केलेल्या उत्पादन अहवाल (KMS २०१७-१८) नुसार मक्याचे उत्पादन १८.६३ दशलक्ष मेट्रीक टन इतके होण्याची शक्यता आहे. कर्नाटक आणि तेलंगन राज्यामधून मक्याची आवक सुरु झाली आहे.

सन २०१६ - १७ हंगामासाठी मक्याची किमान आधारभुत किंमत रु. १३६५ प्रति क्विंटल इतकी होती. सन २०१७- १८ हंगामासाठी किमान आधारभुत किमंत रु. १,४२५ इतकी आहे.

मागील दोन वर्षातील मक्याच्या निझामाबाद बाजारातील मक्याच्या जानेवारी ते मार्च महिन्यात सरासरी किंमती पुढील प्रमाणे.

| वर्ष | किंमती (रु. प्रति क्किंटल) |
|---|---|
| २०१६ | १४७८/- |
| २०१७ | १४६९/- |

२० नोव्हेबर २०१७ रोजी वायदे बाजारातील मक्याच्या किंमती पुढील प्रमाणे.

| महिना | किंमती (रु. प्रति क्किंटल) |
|---|---|
| २० डिसेंबर २०१७ | १३६४ |
| १९ जानेवारी २०१८ | १३७८ |
| २० फेब्रुवारी २०१८ | १३८५ |
| २० मार्च २०१८ | १३९२ |

मागील १२ वर्षातील मक्याच्या बाजारभावाच्याकिंमतीचे अर्थमिती विश्लेषण व बाजारातील सद्यस्थिती वरुन, **जानेवारी ते मार्च २०१८** या कालावधीत **रु. १३०० ते १५००/- प्रति क्विंटल** इतक्या राहण्याची शक्यता आहे. राहतील. पुढील अंदाज अहवाल डिसेंबर २०१७ अखेर प्रकाशित केला जाईल.

* * * * *

## तूरीच्या संभाव्य किंमती - जानेवारी ते मार्च २०१८

भारत हा जगातील सर्वात मोठा तूर उत्पादक तसेच उपभोक्ता देश आहे. अकोला बाजार पेठेतील तूरीच्या सरासरी किंमती रु.३,८००/- ते ४,२००/- प्रति क्विंटल इतक्या कमी होताना दिसतात. दि.०८ सप्टेंबर २०१७ रोजी भारत सरकार कृषि मंत्रालयाने प्रकाशीत केलेल्या अहवालानुसार तुर लागवडीखालील क्षेत्रात मागील वर्षीच्या तुलनेत १८% घट झालेली दिसते. वर्ष २०१६ -१७ मध्ये ५२.१९ लक्ष हेक्टर इतक्या क्षेत्रावर लागवड होती. तर वर्ष २०१७-१८ मध्ये ४२.८१ लक्ष हेक्टर इतक्या क्षेत्रावर लागवड झालेली आहे.

भारत सरकार कृषि मंत्रालयाने प्रकाशीत केलेल्या अहवाल (KMS २०१७-१८) नुसार तुरीचे उत्पादन ३९.९ लक्ष टन होण्याची शक्यता आहे. मागील वर्षी ते ४७.८ लक्ष टन इतके होते. म्हणजेच तूर उत्पादनातच झालेल्या वाढीमुळे उपलब्धता वाढली. वर्ष २०१६ मधील लक्षणीय उत्पादन विचारात घेता तुरीच्या किंमती किमान आधारभूत किंमती रु ५०५० पेक्षा कमी झालेल्या आहेत. सध्य परिस्थितीत शेतकरी, FPOsआणि बाजार समिती कर्मचारी इत्यादीच्या मते तुरीच्या किमती किमान आधारभूत किमती पेक्षा कमी राहण्याची शक्यता वर्तविली आहे. वर्ष २०१६-१७ साठी शासनाने तूर खरेदीचे उद्दिष्ट ६ लक्ष टन इतके होते, परंतू आजपर्यंत १२ लक्ष टनापेक्षा जास्त तूर खरेदी झालेली आहे. तुरीच्या बाजारपेठवर मागील वर्षातील तुर साठा, आयात तसेच मोठ्या प्रमाणावरील उत्पादन यांचा परिणाम असलेला दिसतो.

वर्ष २०१७ -१८ साठी तुरीची किमान आधारभुत किमंत ही रु. ५४५०/- प्रति क्विटंल इतकी आहे. मागील दोन वर्षातील तूरीची अकोला बाजारपेठेतील (जानेवारी ते मार्च) दरम्यानच्या तुरीच्या सरासरी किंमती पुढीलप्रमाणे:

| वर्ष | किंमत (रु. प्रति क्विंटल) |
|---|---|
| २०१६ | ८७०२/- |
| २०१७ | ४५००/- |

सध्यस्थितीनुसार बाजारातील परिस्थिती विचारात घेता, अकोला बाजारपेठेतील **जानेवारी ते मार्च २०१८** या कालावधीत **रु. ३,६०० ते ४,२००/- प्रति क्विंटल** इतक्या राहण्याची शक्यता आहे. पुढील सुधारीत किंमत अहवाल डिसेंबर २०१७ मध्ये प्रकाशित करण्यात येईल.

* * * * *

**अधिक माहितीसाठी कृपया संपर्क करा:**

**प्रकल्प संचालक**

**भारतीय कृषि विपणन माहिती व विश्लेषण केंद्र**

महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प

प्लॉट एफ/इ/७८, पहिला मजला, भूविकास बँक इमारत, मार्केटयार्ड, गुलटेकडी, पुणे - ४११ ०३७.

फोन : ०२० २४२७०३१५, वेबसाईट : http://macp.gov.in